# परांजपे स्कीम्सकडून प्रीमियम निवासी प्रकल्प

## एकात्मिक टाऊनशिपमधील सर्व सुविधा

▶ **पुणे, (का. प्र.)** परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन) लिमिटेडने हिंजवडी फेज १ येथील आपल्या १५० एकरांच्या ब्ल्यू रिज टाऊनशिपमध्ये 'द प्रोमेनेड रेसिडेन्सेस' या नव्या प्रीमियम निवासी प्रकल्पाचे अनावरण केले आहे. आधुनिक वास्तुरचना, प्रशस्त घरे, मुळा नदीचे विहंगम दृश्य आणि एकात्मिक टाऊनशिपमधील सर्व सुविधा यांचा संगम या प्रकल्पात पाहायला मिळणार आहे.

पुण्यातील प्रमुख एकात्मिक टाऊनशिप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्ल्यू रिजमध्ये निवासी संकुले, व्यावसायिक कार्यालये, आयसीएसई शाळा, अत्याधुनिक स्पोर्ट्स क्लब, हाय स्ट्रीट रिटेल, कॅफे, रेस्टॉरंट्स तसेच ९ होल गोल्फ कोर्स अशा सुविधा उपलब्ध आहेत.

यावेळी परांजपे स्कीम्सचे बिझनेस डेव्हलपमेंट संचालक अमित परांजपे म्हणाले, गृहखरेदीदार आता केवळ घर नव्हे, तर उत्तम पायाभूत सुविधा, दर्जेदार परिसर आणि भविष्यात अधिक मूल्य मिळवून देणारी जीवनशैली शोधत आहेत. 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे मुंबईशी संपर्क अधिक वेगवान झाला आहे. या बदलत्या गरजा लक्षात घेऊन ब्ल्यू रिजमध्ये नदीकिनारी आधुनिक आणि प्रीमियम जीवनशैली देणारा 'द प्रोमेनेड रेसिडेन्सेस' विकसित करण्यात आला आहे.